पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८.

**मा.स्थायी समिति विशेष सभा**

कार्यपत्रिका क्रमांक - २१२

**सभावृत्तांत**

दिनांक – **०५/०३/२०२१** वेळ – दुपारी **१२.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची विशेष सभा **शुक्रवार** दिनांक **०५/०३/२०२१** रोजी दुपारी **१२.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात **मा.श्रावण हर्डीकर, (भा.प्र.से.), पिठासीन प्राधिकारी तथा** महानिरीक्षक, नोंदणी व मुद्रांक विभाग, पुणे यांचे अध्यक्षतेखाली आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१. मा.कदम शशिकांत गणपत
२. मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत
३. मा.संतोष बबन कांबळे
४. मा.अभिषेक गोविंद बारणे
५. मा.बुर्डे सुवर्णा विकास
६. मा.फुगे भिमाबाई पोपट
७. मा.पौर्णिमा रविंद्र(आप्पा)सोनवणे
८. मा.सुलक्षणा राजू धर
९. मा.अॅड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे
१०. मा.भोईर सुरेश शिवाजी
११. मा.बापु ऊर्फ शत्रूघ्न सिताराम काटे
१२. मा.भालेकर प्रविण महादेव
१३. मा.बनसोडे राजू विश्वनाथ
१४. मा.यादव मिनल विशाल
१५. मा.पाडाळे निता विलास

याशिवाय मा.पवार – अति.आयुक्त (२), मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.इंदलकर – उपआयुक्त तथा प्र.कायदा सल्लागार, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------

**मा.पिठासीन प्राधिकारी - तथा महानिरीक्षक, नोंदणी व मुद्रांक विभाग, पुणे** सन्मा.सदस्य, उपस्थित सर्व अधिकारी यांचे स्वागत करतो. आजच्या विशेष सभेत स्थायी समितीचे सभापती पदावर नेमणूक करणेचा विषय आहे. त्यासाठी मा.विभागीय आयुक्त, पुणे यांनी सभेची पिठासीन अधिकारी म्हणुन आदेश क्र.नपा/१/कावि/२७२/२०२१, दि.०१/०३/२०२१ च्या आदेशान्वये त्यांचा प्रतिनिधी म्हणून विशेष

स्थायी समिती सभेचा पिठासीन प्राधिकारी म्हणून **मा.श्रावण हर्डीकर, (भा.प्र.से.)** महानिरीक्षक, नोंदणी व मुद्रांक विभाग, पुणे यांना म्हणजे मला या ठिकाणी नियुक्त केलेले आहे.

मुक्त व निर्भयपणे मा.स्थायी समितीच्या सभापती पदाची निवडणुक पार पाडण्यासाठी कामकाजाची लेखी नोंद घेण्याबरोबरच त्या कामाकाजाची व्हिडिओ चित्रणाद्वारे देखील नोंद घेण्याची व्यवस्था ठेवणेत आलेली आहे.

मी नगरसचिव यांना सभेचे कामकाज सुरु करण्याचे आदेश देतो.

**(मा.सभापती, स्थायी समिती यांची निवड करण्यासाठी कार्यपध्दतीची माहिती देण्यात आली.)**

**मा.नगरसचिव -** मा.स्थायी समितीचे सभापती पदावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २१ (१) नुसार नेमणुक करणे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २१ (१) नुसार स्थायी समिती सभापती पदाची निवड करण्यासाठी विशेष बैठकीच्या अध्यक्षस्थानी मा.विभागीय आयुक्त अथवा त्यांचा प्रतिनिधी असेल. मा.विभागीय आयुक्त यांचेकडील आदेश क्र.नपा/१/कावि/२७२/२०२१, दि.०१/०३/२०२१ अन्वये मा.सभापती, स्थायी समिती यांची निवड करण्यासाठी विशेष बैठकीच्या अध्यक्षस्थानी मा.विभागीय आयुक्त, पुणे यांचे प्रतिनिधी म्हणून **मा.श्रावण हर्डीकर, (भा.प्र.से.)** महानिरीक्षक, नोंदणी व मुद्रांक विभाग, पुणे यांची नेमणुक करणेत आलेली आहे.

मुदतीत दोन उमेदवारांनी नामनिर्देशनपत्रे दाखल केली असून त्यापैकी पहिल्या उमेदवाराने एकूण ०३ (तीन) व दुस-या उमेदवाराने ०१ (एक) अशी एकूण ०४ (चार) नामनिर्देशनपत्रे छाननी करिता मा.पिठासीन प्राधिकारी यांचेकडे सुपूर्द करण्यात येत आहेत.

(मा.नगरसचिव यांनी त्यांना मुदतीत प्राप्त झालेली एकूण ०४ (चार) नामनिर्देशनपत्रे मा.पिठासीन प्राधिकारी यांच्याकडे सुपूर्द केली. मा.पिठासीन प्राधिकारी यांनी त्यांची छाननी केली.)

**मा.पिठासीन प्राधिकारी - तथा महानिरीक्षक, नोंदणी व मुद्रांक विभाग पुणे.** पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सभापती, स्थायी समिती पदाकरीता दोन उमेदवारांपैकी पहिल्या उमेदवाराने एकूण ०३ (तीन) व दुस-या उमेदवाराने ०१ (एक) अशी एकूण ०४ (चार) नामनिर्देशनपत्रे मुदतीत दाखल झालेली आहेत. त्यामध्ये उमेदवार व त्यांचे सुचक, अनुमोदक यांची नावे पुढील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | उमेदवाराचे नांव | सुचकाचे नांव | अनुमोदकाचे नांव |
|---|---|---|---|
| १) | मा.अँड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे | मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत | मा.पाडाळे निता विलास |
| २) | मा.अँड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे | मा.बुर्डे सुवर्णा विकास | मा.फुगे भिमाबाई पोपट |
| ३) | मा.अँड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे | मा.भोईर सुरेश शिवाजी | मा.कदम शशिकांत गणपत |
| ४) | मा.भालेकर प्रविण महादेव | मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे | मा.बनसोडे राजू विश्वनाथ |

(या नंतर या नामनिर्देशन पत्रांवर उपस्थित सदस्यांना काही आक्षेप असल्यास त्यासाठी वेळ देण्यात आला.)

**मा.पिठासीन प्राधिकारी - तथा महानिरीक्षक, नोंदणी व मुद्रांक विभाग, पुणे** मा.सभापती, स्थायी समितीचे पदासाठी मुदतीत प्राप्त झालेल्या उपरोक्त एकूण ०४ (चार) नामनिर्देशन पत्रांची छाननी करणेत आली असून **मा.अँड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे** यांनी ०३ (तीन) नामनिर्देशन पत्रे सादर केलेली असून त्यावर उमेदवार यांची स्वाक्षरी आहे. तसेच अनुमोदक – सुचक वेगवेगळे स्थायी समिती सदस्य असून त्यांची स्वाक्षरी असल्याने ते वैध ठरले आहे.

**मा.भालेकर प्रविण महादेव** यांनी ०१ (एक) नामनिर्देशनपत्र सादर केले असून त्यावर उमेदवार यांची स्वाक्षरी आहे. तसेच अनुमोदक – सुचक वेगवेगळे स्थायी समिती सदस्य असून त्यांची स्वाक्षरी असल्याने ते वैध ठरले आहे.

सबब, स्थायी समिती पदाकरिता वैधपणे नामनिर्देशित केलेल्या उमेदवारांची नावे पुढीलप्रमाणे आहेत.

**१) मा.अँड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे.**
**२) मा.भालेकर प्रविण महादेव**

कोणत्याही उमेदवारास १५ मिनिटांच्या आत त्यांनी सही केलेली लेखी नोटीस मा.पिठासीन प्राधिकारी यांजकडे देऊन उमेदवारी मागे घेता येईल.

( मा.पिठासीन प्राधिकारी यांनी उमेदवारी मागे घेण्यासाठी दिलेला दुपारी १२.१६ वा. ते १२.३१ वा. हा १५ मिनिटांचा अवधी संपला)

मा.पिठासीन प्राधिकारी यांनी उमेदवारी मागे घेणेसाठी दिलेल्या १५ मिनिटांच्या अवधीत कोणत्याही उमेदवाराने आपली उमेदवारी मागे घेण्याबाबतचा अर्ज समक्ष मा.पिठासीन प्राधिकारी यांचेकडे सुपुर्त केलेला नाही.

**मा.पिठासीन प्राधिकारी - तथा महानिरीक्षक, नोंदणी मुद्रांक विभाग, पुणे.** उमेदवारी मागे घेणेसाठी दिलेल्या १५ मिनिटांच्या वेळेमध्ये कोणत्याही उमेदवाराने आपली उमेदवारी मागे घेणेबाबतचा अर्ज **व** माझ्याकडे सादर केलेला नसलेने **१) मा.अँड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे व २) मा.भालेकर प्रविण महादेव** हे दोन वैधपणे नामनिर्देशित उमेदवार आहेत.

या नंतर निवडणूक प्रक्रीय पार पडेल. प्रथमतः नगरसचिव निवडणूक प्रक्रीयेची माहिती देतील. मा.नगरसचिव यांना निवडणूक प्रक्रिया सुरु करण्याचे आदेश देत आहे.

**(मा.नगरसचिव यांनी निवडणूक प्रक्रियेबाबत माहिती दिली.)**

| | |
|---|---|
| **मा.पिठासीन प्राधिकारी - तथा महानिरीक्षक, नोंदणी व मुद्रांक विभाग, पुणे.** | पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सभापती, स्थायी समिती पदाकरीता निवडणूक लढविणारे दोन वैधपणे नामनिर्देशित उमेदवार आहेत. त्यांची इंग्रजी वर्णानुक्रमे नावे खालील प्रमाणे आहेत. |

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव |
|---|---|
| १) | **मा.भालेकर प्रविण महादेव** |
| २) | **मा.अँड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे** |

मा.पिठासीन प्राधिकारी तथा महानिरीक्षक, नोंदणी व मुद्रांक विभाग, पुणे यांनी वर्णानुक्रमे प्रथम उमेदवार **मा.भालेकर प्रविण महादेव** यांचे नाव घोषित केले व ज्यांनी हात वर करुन त्या उमेदवाराच्या बाजूने मत दिले अशा मा.स्थायी समिती सदस्यांच्या नावाची नोंद घेतली.

अशा मा.स्थायी समिती सदस्यांची नावे खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | स्थायी समिती सदस्याचे नाव |
|---|---|
| १) | मा.यादव मिनल विशाल |
| २) | मा.सुलक्षणा राजू धर |
| ३) | मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे |
| ४) | मा.बनसोडे राजू विश्वनाथ |
| ५) | मा.भालेकर प्रविण महादेव |

त्यानंतर मा.पिठासीन प्राधिकारी तथा महानिरीक्षक, नोंदणी व मुद्रांक विभाग, पुणे यांनी वर्णानुक्रमे द्वितीय उमेदवार **मा.अँड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे** यांचे नाव घोषित केले. व ज्यांनी हात वर करुन त्या उमेदवाराच्या बाजूने मत दिले अशा मा.स्थायी समिती सदस्यांच्या नावांची नोंद घेतली.

अशा मा.स्थायी समिती सदस्यांची नावे खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | स्थायी समिती सदस्याचे नाव |
|---|---|
| १) | मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकात |
| २) | मा.संतोष बबन कांबळे |
| ३) | मा.अभिषेक गोविंद बारणे |
| ४) | मा.भोईर सुरेश शिवाजी |
| ५) | मा.बापु ऊर्फ शत्रुघ्न सिताराम काटे |
| ६) | मा.कदम शशिकांत गणपत |
| ७) | मा.पाडाळे निता विलास |
| ८) | मा.बुर्डे सुवर्णा विकास |
| ९) | मा.फुगे भिमाबाई पोपट |
| १०) | मा.अँड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे |

**मा.पिठासीन प्राधिकारी तथा महानिरीक्षक, नोंदणी व मुद्रांक विभाग, पुणे.** - मा.सभापती, स्थायी समिती पदाकरीता हात वर करून मतदान घेण्यात आले. त्याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे -

| | | |
|---|---|---|
| **i)** | एकूण स्थायी समिती सदस्यांची संख्या | - **१६** |
| ii) | एकूण उपस्थित स्थायी समिती सदस्य संख्या | - १५ |
| iii) | एकूण अनुपस्थित स्थायी समिती सदस्य संख्या | - ०१ |
| **iv)** | एकूण मतदान केलेल्या स्थायी समिती सदस्यांची संख्या | - **१५** |
| v) | मतदान न केलेल्या स्थायी समिती सदस्यांची संख्या | - **००** |

vi) निवडणूक लढविणा-या प्रत्येक उमेदवारास प्राप्त झालेल्या मतांची संख्या खालीलप्रमाणे आहे.

**१) मा.भालेकर प्रविण महादेव - ०५ मते**
**२) मा.अँड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे - १० मते**

यावरुन **मा.अँड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे** यांना मा.सभापती, स्थायी समिती पदाकरिताच्या मतदानात सर्वात जास्त मते पडलेली असल्याने **मा.अँड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे** यांना सभापती, स्थायी समिती पदाकरिता वैधरित्या निवडून आल्याचे मी जाहीर करतो.

---------

ठराव क्रमांक - ८९३७ विषय क्रमांक – १

दिनांक - ०५/०३/२०२१ विभाग - नगरसचिव

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.सभापती, स्थायी समिती पदासाठी मुदतीत दाखल झालेल्या व वैध ठरलेल्या नामनिर्देशन पत्रांमधील दोन उमेदवारांपैकी उमेदवारी मागे घेण्यासाठीच्या १५ मिनिटांच्या अवधीत कोणत्याही उमेदवाराने लेखी अर्ज देऊन उमेदवारी मागे घेतली नसल्याने निवडणूक लढविणारे **१) मा.भालेकर प्रविण महादेव, व २) मा.अँड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे** हे दोन वैधपणे नामनिर्देशित उमेदवार असल्याने नियमाप्रमाणे घेणेत आलेल्या मतदानामध्ये –
**१) मा.भालेकर प्रविण महादेव,** यांना - **०५ मते, २) मा.अँड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे** यांना - **१० मते** मिळाल्याने व यावरुन **मा.अँड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे** यांना सर्वात जास्त मते पडलेली असल्याने नियमाप्रमाणे **मा.अँड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे** यांना पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.सभापती, स्थायी समिती पदावर रितसर वैधरित्या निवडून आल्याचे जाहीर करण्यात येत आहे.

----------

( नवनिर्वाचित सभापती, मा.स्थायी समिती **मा.अँड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे** यांचे मा.पिठासीन प्राधिकारी यांनी पुष्पगुच्छ देवून स्वागत केले**.**)

----------

यानंतर मा.पिठासीन प्राधिकारी यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

सही/-
**(श्रावण हर्डीकर, भा.प्र.से.)**
**पिठासीन प्राधिकारी तथा**
महानिरीक्षक, नोंदणी व मुद्रांक विभाग, पुणे
स्थायी समिती (विशेष सभा)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/५९८/२०२१
दिनांक : ०५/०३/२०२१



**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

Nagarsachiv1\Standing Election 2021\Standing Proceeding -A1.doc